# बिन लादेन : एका शेवटाची अप्रस्तुती

**चंद्रशेखर पुरंदरे**

११ सप्टेंबर २००१ च्या न्यूयॉर्कमधील वर्ल्ड ट्रेड सेंटरवरील हल्ल्यांपासून जगातील हिंसाचार एकदम वाढला. बिन लादेन व त्याची अल-कईदा ही संघटना या हल्ल्यांच्या मागे असल्याचे जाहीर करून पाकिस्तानच्या संगनमताने अमेरिकेने अफगाणिस्तानात सैन्य घुसवले. ते अजून तेथे आहे. दुसऱ्या बुशच्या शब्दांत बिन लादेनला 'जिवंत अथवा मृत' पकडणे हा या कारवाईचा उद्देश होता. मध्यंतरी इराक युद्धही सुरू झाले. त्या युद्धासाठीही सांगण्यात आलेल्या खोट्या कारणांपैकी एक कारण अल-कईदा व सद्दाम हुसेन यांचे संगनमत आहे हे होते. एकूण गेले दशक आणि एक ट्रिलियन डॉलर्सहून अधिक पैसा अमेरिकेने या मोहिमेवर खर्च केला आहे.

२ मे रोजी अध्यक्ष ओबामांनी जाहीर केले की एकही अमेरिकन कामी न येता बिन लादेनला ठार मारण्यात आले आहे. न्यायनिवाडा झाला आहे. तेव्हापासून जगभर निरनिराळ्या प्रतिक्रिया व भविष्याबाबत निरनिराळे अंदाज उमटत आहेत.

अमेरिका, अफगाणिस्तान, पाकिस्तान व मध्यपूर्व असा या प्रश्नाचा विस्तार आहे.

बिन लादेनच्या हत्येची बातमी जाहीर होताच अनेक अमेरिकन रस्त्यावर आले. विशेषत: न्यूयॉर्क आणि वॉशिंग्टनमध्ये सार्वजनिक जल्लोष झाला. ११ सप्टेंबरच्या बातमीनंतर, मध्यपूर्वेत विशेषत: पॅलेस्टाईनमध्ये वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या हत्याकांडाबद्दल असाच जल्लोष झाला होता. त्याची आठवण होऊन अल-कईदाचीच रण'नीती' अमेरिकेने अवलंबणे कितपत योग्य होते यावर आता चर्चा चालू आहे. उद्देश बिन लादेनला अटक करण्याचा होता का ठार मारण्याचा यावर तर्कवितर्क लढवले जात आहेत. ठेचून ठार मारणे हीच मोहीम होती, तर ती कोणत्या आंतरराष्ट्रीय कायद्यात बसते? ११ सप्टेंबरची घटनाही कायदाबाह्यच होती, हे उत्तर काही लोकशाही असणाऱ्या व सुसंस्कृत मूल्यांचा प्रचार करणाऱ्या जगाकडून अपेक्षित नाही. विशेष म्हणजे, दुसऱ्या बुश महाशयांच्या कारकीर्दीत अल-कईदाचे बरेच जिहादी अमेरिकेने ग्वांटानामो बे या तुरूंगात टाकले होते. त्यांचे शारीरिक हाल करून अल-कईदाबद्दल अधिक माहिती मिळवणे हा धोरणाचा भाग होता. त्यावर टीकेची झोड उठल्यावर ते प्रयत्न कमी करण्यात आले. अध्यक्षपदाच्या निवडणुकीत ओबामा महाशयांनी या चौकशी तंत्रांचा निषेध केला होता. आरोपींचे व कैद्यांचे मानवी अधिकार या मुद्यावर हा विरोध होता. तोच उमेदवार आज अध्यक्ष झाल्यावर तेच धोरण अंगिकारताना दिसतो आहे याची दखल अमेरिका व युरोपमध्ये घेतली जात आहे.

मग प्रत्यक्ष घटना काय घडली यावर गोंधळ सुरू झाला. बिन लादेनकडे बंदूक होती का, तो बायकोच्या (तीनपैकी एक) मागे दडला का त्याला वाचवायला ती मध्ये आली, वगैरे. मग मारला तो बिन लादेनच होता का, प्रेताची विल्हेवाट समुद्रात जलसमाधी देऊन का करण्यात आली असेही प्रश्न पुढे आले. एकूण हे संशयाचे वातावरण कायमच राहणार. पण तसे हे किरकोळ मुद्दे झाले.

अमेरिकेच्या अंतर्गत राजकारणाची निकड या प्रकरणात दुर्लक्षिण्यासारखी नाही. ओबामांची लोकप्रियता घटत आहे. अर्थव्यवस्था गोत्यात आहे आणि पुढच्या अध्यक्षीय निवडणुका जवळ येत आहेत. अशावेळी अशी सनसनाटी घटना घडवणे हे अमेरिकन अध्यक्षांचे जुने धोरण आहे.

अफगाणिस्तानाबाबत मुळात बिन लादेनला पकडण्यासाठी तेथे युद्ध सुरू करण्यात आले. मग आता अमेरिकन सैन्य तेथे ठेवण्याचे कारण नाही असा विचार पुढे येत आहे. भारत व अफगाणिस्तान या दोघांनीही बिन लादेन पाकिस्तानात सापडल्यावर ''तरी आम्ही म्हणतच होतो की मुस्लिम आतंकवाद पाकिस्तानातून येतो'' अशी भूमिका घेतली आहे. एरवीही अमेरिका अफगाणिस्तानातून काढता पाय घेण्यामागे आहे. ती प्रक्रिया लवकर व्हावी म्हणून तलेबान उत्सुक आहे. आमचा अल-कईदाशी फारसा संबंध नव्हताच असे आता तलेबानचे प्रतिपादन आहे. कारण अमेरिकेच्या गच्छंतीनंतर परत सत्तेचे त्यांना वेध लागले आहेत.

पाकिस्तान हा यातला सगळ्यात गुंतागुंतीचा प्रश्न आहे. एकतर मुस्लिम आतंकवाद आणि बिन लादेन यांच्याविरुद्ध आघाडी चालू ठेवण्यासाठी पाकिस्तान गेली अनेक वर्षे कित्येक बिलियन डॉलर्सची अमेरिकन मदत दरवर्षी घेत आहे. यातला बहुतेक भाग लष्करी खर्चावर व बाकीचा भ्रष्टाचारात जातो. इतर अमेरिकन मदतही बरीच असते पण ती ज्यांच्यापर्यंत पोचायला हवी त्या सामान्य जनतेपर्यंत पोचत नाही. त्यामुळे तेथे अंतर्गत अस्थैर्य कायम आहे. लष्कर ही एकच संस्था भारतद्वेष आणि अमेरिकन पैसा यावर स्थिर आहे. पाकिस्तानची अफगाण तलेबानलाही छुपी मदत असतेच. आता तर ॲबटाबाद या लष्करी छावणीच्या शहरातच बिन लादेन एका मोठ्या प्रासादात किमान पाच-सहा वर्षे राहत

होता हे उघड झाले आहे. पाकिस्तानचे अधिकृत वक्तव्य ''आम्हाला त्याची कल्पनाच नव्हती'' हे आहे. त्यावर कोणाचाच विश्वास नाही. बिन लादेनची स्वत:ची सुरक्षाव्यवस्था - बॉडीगार्डस् वगैरे - जवळजवळ नव्हतीच म्हणजे त्याची भिस्त पाकिस्तानी हस्तकांकडून मिळणाऱ्या सुरक्षेवर होती हेही स्पष्ट झाले आहे. त्यामुळे आतंकवादाविरुद्धच्या लढ्यात भागीदार असूनही अमेरिकेने या कारवाईची पाकिस्तानला पूर्वसूचनाही दिली नाही कारण बिन लादेनला सावध केले जाईल ही शक्यता होती. अफगाणिस्तानातील तळावरून हेलिकॉप्टर्स सरळ बिन लादेनच्या घरावर गेली. त्यातही पाकिस्तानी मानसिकता पाहण्यासारखी आहे. पाकिस्तानच्या अमेरिकेतील राजदूताने अमेरिकन टीव्हीला दिलेल्या मुलाखतीनुसार, ही हेलिकॉप्टर्स पाकिस्तानी हवाई क्षेत्रात आली तेव्हा लष्कराची खात्री होती की हा हल्ला भारत करत आहे! यावरून भारतद्वेष किती मुरला आहे हे लक्षात यावे.

आपल्याला अंधारात ठेवून अमेरिकेने आपल्या भूमीवर ही कारवाई करावी ही घटना पाकिस्तानी सरकार, लष्कर व जनता यांना चांगलीच झोंबलेली आहे. आधीच मूलतत्त्ववाद्यांविरोधी मोहिमेत अमेरिकन स्वयंचलित विमाने पाकिस्तानात बॉम्ब टाकतात व जास्त करून निरपराधी पाकिस्तानी नागरिक त्यात मरतात त्यामुळे वातावरण अमेरिकाविरोधी आहेच, पण या घटनेचा परिणाम निराळ्या, अधिक गंभीर दिशेनेही झाला आहे. पाकिस्तानची अण्वस्त्रक्षमता हा त्या देशाच्या जनतेच्या अस्मितेचा भाग आहे. जर आपल्या शासनाला व लष्कराला बिन लादेन इतकी वर्षे तेथे आहे हे कळले नाही, तर या संस्था आपले अणुप्रकल्प भारत किंवा अमेरिका यांच्या संभाव्य हल्ल्यांपासून कसे सुरक्षित राखणार या विद्वेषपूर्ण काळजीने तेथील जनमानस ग्रासले आहे.

दुसऱ्या बाजूला, आतंकवाद मोडून काढण्यासाठी पाकिस्तानला एवढी मदत करायची आणि पाकिस्तान तर विश्वासार्ह भागीदार नाही हे दिसत आहे; तर ही मदत आटवा - असे प्रतिपादन अमेरिकन खासदारांनी सुरू केले आहे. तालिबानला पाठिंबा देत अफगाणिस्तानात अस्थैर्य ठेवायचे हे तर पाकिस्तानचे धोरण आहेच. वस्तुत: अफगाणिस्तानवर रशियाने १९७९ मध्ये आक्रमण केले तेव्हा त्याला शह म्हणून अमेरिकेच्या सीआयएने आयएसआय या पाकिस्तानी गुप्तहेर संघटनेशी हातमिळवणी करून मुस्लिम मूलतत्त्ववाद जन्माला घातला. त्यासाठी अफगाण तलेबानला पाकिस्तानात प्रशिक्षण देण्यात आले आणि गरीब पाकिस्तानी मुलांना कडवे धार्मिक शिक्षण मदरसातून देण्यात आले. रशियाविरुद्धच्या या कारवाईत बिन लादेन व सीआयए एकाच बाजूला होते. नंतर रशिया तेथून हलला आणि मुस्लिम मूलतत्त्ववादी राजवट आली. ती २००१ नंतर उलथण्यात आली तेव्हा पाकिस्तानने रातोरात धोरण बदलून त्या राजवटीविरुद्ध अमेरिकेची साथ देण्याचे ठरविले. हा इतिहास असताना या घटनेनंतर लोकसभेत निवेदन करताना पाकिस्तानच्या पंतप्रधानांनी या मूलतत्त्ववादाच्या वाढीचे खापर अप्रत्यक्षपणे अमेरिकेवर फोडले! तरीही ही अभद्र युती चालू राहील असे दिसते.

या प्रकरणाचा पुढचा पैलू म्हणजे आता अल-कईदाचे काय? बिन लादेन स्वत: अतिश्रीमंत सौदी उद्योगपती होता. स्वत:चा पैसा त्याने जिहादसाठी आणलाच पण सौदी अरेबियातील व मध्यपूर्वेतील इतर अतिश्रीमंत व पश्चिमेला छुपा विरोध असणाऱ्या लोकांकडूनही तो पैसा गोळा करत राहिला. हा स्रोत आता आटण्याची शक्यता आहे. त्यात मध्यपूर्वेतील अरब राष्ट्रांमध्ये अंतर्गत परिस्थितीच अचानक बदलली असल्याने अशा कारणांसाठी पैसे पाठवणे तेथील प्रस्थापिताला आता परवडणारे नाही. मुळात एक अमेरिका द्वेष सोडता बिन लादेनने कोणताच विधायक कार्यक्रम मांडला नाही. त्यातही गेल्या काही वर्षांत त्याच्या कडव्या मुस्लिम पंथीयांना त्याने मुभा दिली की इतर मुस्लिम पंथीय धर्मद्रोही म्हणून मानावेत. त्यामुळे विशेषत: इराकमध्ये शेकड्याने शियापंथीय मारले गेले आहेत. किंबहुना या जागतिक जिहादमध्ये इतर धर्मीयांपेक्षा मुस्लिमच कित्येक पटींनी मारले गेले आहेत. याचा परिणाम म्हणजे मुस्लिम जगतातील सामान्य जनमत बिन लादेनला अनुकूल राहिलेले नाही.

मध्यपूर्वेतील सध्याची लोकांची चळवळ तद्देशीय हुकूमशाही संपवून लोकशाही आणण्यासाठी आहे. तिला मूलतत्त्ववाद किंवा अमेरिकाविरोध दोन्हीचे आकर्षण नाही आणि या चळवळी तेथील तळागाळातून वर येत आहेत.

अर्थात जोपर्यंत या प्रदेशात काही प्रमाणात तरी बेकारी कमी होत नाही, लोकांना खुल्या राजकीय विरोधाची थोडीफार तरी मुभा मिळत नाही (अगदी निर्वाचित लोकशाही नसली तरी) तोपर्यंत असंतोष खदखदत राहणार आणि मूलतत्त्ववादी गट त्याचा फायदा घेऊन काही तरुणांना त्या राजवटी किंवा पश्चिम यांच्याविरुद्ध हिंसाचार करायला भरीस पाडणार, मग दोन्ही पक्षांकडून हिंसाचाराची देवघेव चालू राहणार.

तात्पर्य, अमेरिकेसारख्या बलाढ्य महासत्तेला तिच्याच शब्दांत उत्तर देऊन हलवता येते एवढे बिन लादेनने सिद्ध केले. पण ११ सप्टेंबर २००१ हा एक प्रसंग झाला. त्या अमेरिकाविरोधाची प्रक्रिया विधायक मार्गाला लावणे त्याच्या कुवतीबाहेरचे होते. त्यामुळे त्याच्या मृत्यूने जागतिक राजकारणात दूरगामी परिणाम होतील असे दिसत नाही.

*E-mail - artnondeco@yahoo.co.uk*
*Website - www.art-non-deco.com*